# कोरेगाव भिमा येथे ऑर्केस्ट्रामध्ये दोन गटांमध्ये हाणामारी

## पोलिसांत दोन्ही गटांच्या २९ जणांवर परस्परविरोधी गुन्हे

**शिक्रापूर** : कोरेगाव भिमा (ता. शिरूर) येथे भैरवनाथ यात्रेनिमित्त ऑर्केस्ट्रामध्ये गाणी सुरु असताना समोर नाचण्याच्या वादातून दोन गटांमध्ये दांडक्याने हाणामारी तसेच ऑर्केस्ट्रा मधील सामानांची मोडतोड केल्याबाबत शिक्रापूर पोलीस ठाण्यात येथे दोन्ही गटांच्या २९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अनिकेत पोपट गव्हाणे (रा. कोरेगाव भिमा ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, येथे भैरवनाथ यात्रेनिमित्त धुमधडाका ऑर्केस्ट्रा आयोजित करण्यात आला होता, तर ऑर्केस्ट्रा सुरु असताना गाण्याच्या तालावर नाचून ऑर्केस्ट्रा बंद पाडा असे म्हणत प्रवीण आबा गव्हाणे, साईनाथ राजाराम गव्हाणे, नितीन बाबुराव गव्हाणे, साहिल हरी गव्हाणे, प्रशांत रोहिदास गव्हाणे, अभिषेक भानुसाद नाबगे, ऋषीराज दशरथ गव्हाणे, वैभव सावकार गव्हाणे, पोपट एकनाथ गव्हाणे, दत्तात्रय राजाराम गव्हाणे (सर्व रा. डिंग्रजवाडी ता. शिरूर) यांसह इतर पाच जणांनी अनिकेत गव्हाणे, ज्ञानेश्वर गव्हाणे यांच्यासह इतर लोकांना लाकडी दांडक्याने, हाताने मारहाण करत शिवीगाळ करून ऑर्केस्ट्राचे मालक रवींद्र तोताराम जाधव यांच्या ऑर्केस्ट्रा मधील सामानाची तोडफोड केली असल्याचे म्हटले आहे.

तर शैलेश वसंत गव्हाणे (रा. डिंग्रजवाडी, ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत ऑर्केस्ट्रा सुरु असताना आम्ही ऑर्केस्ट्रा पाहत असताना शेजारून अनिकेत गव्हाणे चालत होता यावेळी त्यांच्याबरोबर असलेल्या मुलांनी त्याला उचलून घेतले यादरम्यान आमच्या सोबत असलेल्या पोपट एकनाथ गव्हाणे याला त्यांची लाथ लागली त्यावेळी लाथ लागली असल्याचे विचारलेल्या कारणावरून शुभम सोपान गव्हाणे, अनिकेत पोपट गव्हाणे, निखील राजाराम गव्हाणे, अभी अनिल सव्वाशे, विकी गव्हाणे, मधुकर सुनील नानगुडे, जितेंद्र सोपान गव्हाणे, आकाश अनिल गव्हाणे, बबड्या उर्फ अनिकेत साहेबराव गव्हाणे, चैतन्य पोपट गव्हाणे, गणेश गव्हाणे (सर्व रा. कोरेगाव भिमा, ता. शिरूर) व इतर ४ जणांनी शैलेश गव्हाणे, साहिल गव्हाणे, ओमकार गव्हाणे, साईनाथ गव्हाणे व अभिषेक नाबगे यांना शिवीगाळ करत काठीने, हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे म्हटले आहे.

याबाबत अनिकेत पोपट गव्हाणे तसेच शैलेश वसंत गव्हाणे यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद दिली असून शिक्रापूर पोलिसांनी दोन्ही गटांच्या २५ ते ३० जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रमेश गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वारुळे व पोलीस हवालदार पुनाजी जाधव हे करत आहेत.

# उजनीत नाव उलटून चार तरुण डॉक्टर बुडाले



पुणे : उजनी जलाशयात जलविहारासाठी गेलेल्या डॉक्टरांची नाव उलटून चार तरुण डॉक्टरांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी घडली.

उजनी जलाशयात जलविहारासाठी गेलेल्या डॉक्टरांची नाव उलटून चार तरुण डॉक्टरांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी घडली. नावाडी नसताना नाव जलाशयात नेण्याचा धोका त्यांनी पत्करला. या दुर्घटनेत दहा डॉक्टर बुडाले. त्यापैकी सहाजण पोहून बाहेर आले. मात्र, चार मित्र बुडाले. दरम्यान, तीनजणांचा शोध घेण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक (एनडीआरएफ) तेथे दाखल झाले आहे.

डॉ. सुभाष मांजरेकर (रा. अकलुज, जि. सोलापूर), डॉ. महेश लवटे, डॉ. अण्णासाहेब शिराडे, डॉ. चंद्रकांत उराडे, (तिघे रा. नातेपुते, जि. सोलापूर) अशी बुडालेल्यांची नावे आहेत. डॉ. प्रवीण श्रीरंग पाटील, डॉ. दत्तात्रय भगवान सर्चे, डॉ. दिलीप तुळशीराम वाघामोडे (तिघे रा. माळशिरस, जि. सोलापूर), डॉ. अतुल विनोदकुमार दोशी, डॉ. श्रीकांत नंदकुमार देवडेकर, डॉ. समीर अशोक दोशी (तिघे रा. अकलूज, जि. सोलापूर) अशी बचावलेल्यांची नावे आहेत.

इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिनेश कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहा डॉक्टर उजनी जलाशयाच्या परिसरात फिरायला आले होते. त्यांनी नावाडय़ाकडून नाव जलविहारासाठी घेतली. जलाशयात नाव नेल्यानंतर ती उलटली. नावेत असलेले दहा डॉक्टर बुडाले. त्यापैकी डॉ. पाटील, डॉ. सर्चे, डॉ. वाघमोडे, डॉ. दोशी, डॉ. देवडेकर पोहून बाहेर आले. डॉ. मांजरेकर, डॉ. लवटे, डॉ. शिराडे, डॉ. उराडे हे बुडाले. काठावर पोहून आलेल्या डॉक्टरांनी या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांना दिली. त्यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली.

डॉ. मांजरेकर, डॉ. उराडे यांचे मृतदेह स्थानिक नागरिकांच्या मदतीने बाहेर काढले. डॉ. शिराडे, डॉ. लवटे यांचे मृतदेह सापडले नाहीत. एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. अंधार पडल्यानंतर शोधमोहीम थांबवण्यात आली.

डॉक्टरांच्या कुटुंबीयांना या घटनेची माहिती देण्यात आली आहे. त्यांचे कुटुंबीय इंदापूर येथे पोहोचले आहेत. शवविच्छेदनानंतर त्यांच्या ताब्यात मृतदेह देण्यात येणार आहेत.

# भिगवणमध्ये अपघातात एकाचा मृत्यू



**भिगवण (प्रतिनिधी)** : भिगवणमधून जाणारा पुणे सोलापूर महामार्ग हा मृत्युचा सापळा बनत चालला आहे. भिगवण ग्रामपंचायत समोरील भागात सतत अपघात होत असून, आज सकाळी मालगाडी व टेम्पो यांचेत धडक होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एकजण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत भिगवण पोलीस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की, आज सकाळी ६.३० वाजण्याचे सुमारास मालगाडी (एमएच १४/४५६२) ही पुण्याकडून सोलापूरकडे जात असताना या मालगाडीने अचानक लेन बदली करून ब्रेक लावल्याने पाठीमागून येणाऱ्या टेम्पोने (एमएच ०४ एचडी ५८९०) या मालगाडीस पाठीमागून जोरदार धडक दिली.

टेम्पोमधील करीम फक्रुद्दिन शेख (रा. कळंबोली, मुंबई) हा जागीच ठार झाला असून टेम्पो चालक शिवकुमार केशर वाणी (रा. बगार, ता. कोयराहुना, उत्तरप्रदेश) हा जखमी झाला आहे. याबाबत वाणी यांनी भिगवण पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. या घटनेचा अधिक तपास एस पी काळे हे करीत आहेत.




# कल्याण: पतीच्या मित्रांचा विवाहितेवर बलात्कार

## दोघांना अटक



**ठाणे** : उसने पैसे देण्याच्या बहाण्याने महिलेला घरी बोलावून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. दोघेही पीडितेच्या पतीचे मित्र आहेत. कल्याणमधील द्वारली पाड्यात ही धक्कादायक घटना घडली आहे. दोघेही संशयित आरोपी बेस्टचे चालक असून उल्हासनगर हिललाईन पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी सुनील मोरे आणि अरविंद कुंभार यांना अटक केली आहे. हे दोघेही पीडित महिलेच्या पतीचे मित्र आहेत. तिच्या पतीने सुनील मोरे याच्याकडे १० हजार रुपये उसने मागितले होते. हे पैसे देण्याच्या बहाण्याने या दोघांनी पीडितेला बुधवारी द्वारली पाड्यातील घरी बोलावले होते. तिथे मोरे याच्यासह अरविंद कुंभार यांने तिच्यावर बलात्कार केला.

त्याचे चित्रणही त्यांनी मोबाईलमध्ये केले. पीडितेने शुक्रवारी अरविंद कुंभार याचा मोबाईल मिळवला. त्यानंतर थेट पोलीस ठाण्यात धाव घेतली. तिच्या तक्रारीवरून हिललाईन पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

# स्वाईन फ्लूने महिलेचा मृत्यू

**पिंपरी, (प्रतिनिधी)** : पिंपरी चिंचवड शहरात स्वाईन फ्लूने उच्छाद मांडला आहे. तळेगांव येथील एका ३८ वर्षीय महिला स्वाईन फ्लूवर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारदरम्यान शनिवारी तिचा मृत्यू झाला.

स्वाईन फ्लूने आजपर्यंत शहरातील १६ स्त्री-पुरुषांचा बळी घेतला आहे. मात्र, पालिका आरोग्य वैद्यकीय विभाग स्वाईन फ्लूवर गंभीर उपाययोजना करीत नसल्याने स्वाईन फ्लू बांधितांची संख्या वाढतच चालली आहे.

शहरातील २२ रुग्णांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहे. तळेगांव येथील एक ३८ वर्षीय महिलेला शहरातील खासगी रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. मृत्युमुखी पडलेल्या त्या महिलेस स्वाईन फ्लूची लागण झाली होती. तसा अहवाल गुरुवारी (२७ एप्रिल) आला होता. त्यानंतर तिच्यावर स्वाइन फ्लूचे उपचार सुरू करुन व्हेटींलेटर ठेवण्यात आली होती.

परंतू, उपचार सुरु असताना २९ एप्रिल त्या महिलेचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान शनिवारी (दि.२९ एप्रिल) दिवसभरात शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये ३८४२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६९ रुग्णांवर टॅमीफ्लूचे उपचार सुरू करण्यात आले आहेत.

संशयित १२६ रुग्णांचा द्रवण तपासणीस पाठविले आहे. २२ रुग्णांना विविध रुग्णालयात व्हेंटीलेटर ठेवण्यात आले, अशी माहिती आरोग्य विभागाने कळविली आहे.

# पिंपरीत दोन मोबाईल चोरांना अटक; ७२ मोबाईल जप्त



**पुणे (प्रतिनिधी)** : पुण्यामध्ये मोबाईल चोरणाऱ्या करणाऱ्या दोन अट्टल चोरांना पिंपरी पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्यांच्याडून ७२ मोबाईल संचांसह एक पल्सर दुचाकी जप्त करण्यात आली. ही कारवाई गुरुवारी पहाटे गस्तीवरील पोलिसांनी केली. यंशवत उर्फ गोंड्या बाळू वाघमारे (१८) आणि तालिफ उर्फ मिरची वली शेख (१८ दोघे रा. गांधीनगर, पिंपरी) अशी अटक करण्यात आलेल्या मोबाईल चोरट्यांची नावे आहेत. त्यांच्याकडे ७२ मोबाईल संच आढळले असून ते पोलिसांनी जप्त केले. तसेच चोरी करण्यासाठी वापरत असलेली एक पल्सरही जप्त केली.

पिंपरीच्या संत तुकारामनगर मार्शलचे पोलीस शिपाई घाडगे, कुंभार, हवालदार खेडकर, महिला शिपाई पाटील, शिंदे यांनी ही कामगिरी केली. दोघा चोरांवर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर यांनी सांगितले.


# ट्रक आणि स्कॉर्पियोचा अपघात, ९ जखमी




**मुंबई (प्रतिनिधी)** : स्कॉर्पियो आणि ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना मध्यरात्री माटुंगा येथे घडली . या अपघातात ९ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रात्री एक वाजेच्या सुमारास दादर-माटुंगा पुलावर सीएसटीच्या दिशेने एक स्कॉर्पिओ भरधाव वेगात जात होती. चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही स्कॉर्पियो डिव्हायडर पार करून बाजूच्या रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रकला जोरात धडकली. या स्कॉर्पियो मधील ७ जण तसेच ट्रक चालक आणि क्लिनर सुद्धा जखमी झाले. अपघातानंतर माटुंगा पोलीस आणि अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळावर पोहचेल. अपघातानंतर पोलिसांना या स्कॉर्पियोमध्ये बियरच्या बाटल्या आढळल्या. स्कॉर्पियो चालक नशा करून गाडी चालवत होता की नाही हे मेडिकल रिपोर्ट आल्याणानंतरच कळणार. याबाबत पोलिसांनी मात्र बोलण्यास नकार दिला.

# काश्मीरमध्ये लष्करी तळावर हल्ला, ३ जवान शहीद



**श्रीनगर** : जम्मू काश्मीरमध्ये लष्करी तळावर दहशतवाद्यांनी पुन्हा हल्ला केला आहे. यात सैन्याचे तीन जवान शहीद झाले आहेत. सुरक्षा दलाच्या जवानांनी हल्ला करणाऱ्या दोन्ही दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. लष्करी तळाच्या परिसरात आता शोधमोहीम राबवली जात आहे. कुपवाड्यामधील पंझगाममधील लष्करी तळाला दहशतवाद्यांनी लक्ष्य केले आहे.

कुपवाड्यामधील पंझगाम येथे लष्करी तळ असून या तळावर सैन्याचा दारुगोळा ठेवला जातो. सीमा रेषेपासून हे तळ जवळ आहे. गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास दहशतवाद्यांनी या तळावर हल्ला केला. जवानांनीही दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले.

# लोणावळ्यात भर चौकात तरुणीचा विनयभंग

**लोणावळा** : येथील जयचंद चौक ते साधना मॉल दरम्यान भर दुपारी व वर्दळीच्या चौकात तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी दोन अज्ञात इसमांच्या विरुध्द विनयभंगाचा गुन्हा लोणावळा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. ओळकाईवाडी लोणावळा येथील एक ३० वर्षीय महिला महावीर मेडिकल, जयचंद चौक येथे रस्त्याने जात असताना एका सफेद रंगाच्या कार मधून आलेल्या दोन इसमांनी सदर तरुणीच्या मागे गाडीचा हॉर्न वाजवत तिला गाडीत बसण्याचा इशारा केला. यावेळी सदर तरुणीने रिक्षामध्ये बसून पुढे जाण्याचा प्रयत्न केला असता, त्या अनोळखी इसमांनी तिचा पाठलाग करत साधना मॉल समोर रिक्षात दोन्ही बाजूने बसत तिला जबरदस्तीने गाडीत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी भेदरलेली सदर तरुणी एका दुकानात पळाल्याने ते इसम निघून गेले.

# थरमॅक्स चौकात रिक्षा चालकाचा मोबाईल चोरणारे ताब्यात

**पिंपरी (प्रतिनिधी)** : पत्नीसोबत घरी पायी जात असताना दोन अनोळखी तरुणांनी रिक्षा चालकाचा मोबाईल हिसकावून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांना निगडी पोलिसांनी ताब्यात घेऊन मोबाईल जप्त केला. ही घटना थरमॅक्स चौकात घडली होती. काशीनाथ बावस्कर (२८, रा. चिंचवड) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन गुन्ह्यामध्ये चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काशीनाथ बावस्कर हे मंगळवारी रात्री पत्नीसोबत पायी घरी जात होते. त्यावेळी दोन अल्पवयीन मुलांनी त्यांच्या हातातील मोबाईल हिसका मारुन चोरुन नेला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी या परिसरात चोरट्यांचा शोध घेऊन दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून काशीनाथ यांचा बारा हजार रुपयांचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. पोलीस हवालदार एन.पी. जाधव तपास करीत आहेत.

# सोलापूरजवळ मालगाडीचे डबे घसरले

## दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीवर परिणाम




**वाडी जंक्शनवरून होटगी स्थानकाकडे सिमेंटसाठीचा कच्चा माल या मालगाडीत आणण्यात येत होता.**

**पुणे** : दुधनी (ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) नजीक रेल्वे रूळांना तडे गेल्याने मालगाडीच्या इंजिनसहित ५ वॅगन घसरले आहेत. त्यामुळे दक्षिण भारतात जाणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे. ही घटना रविवारी मध्यरात्री १२:३० च्या सुमारास घडली आहे.

वाडी जंक्शनवरून होटगी स्थानकाकडे सिमेंटसाठीचा कच्चा माल या मालगाडीत आणण्यात येत होता. रात्री १२.३० च्या सुमारास दुधनी रेल्वे स्थानकाजवळ रूळाला तडे गेल्याने या मालगाडीचे इंजिन आणि ५ डबे घसरले. या अपघातामुळे दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. यामुळे काही रेल्वे रद्द करण्यात आले आहेत. तर काहींचे मार्ग बदलण्यात आले आहे. दरम्यान, रेल्वे रुळ दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर सुरु असल्याची माहिती उप रेल्वे प्रबंधक राजेंद्र शर्मा यांनी दिली आहे.

# घरावरचा चेंडू काढताना शॉक लागून चिमुकल्याचा मृत्यू



**पुणे** : खड़कीतील मरिआई माता परिसरात असणाऱ्या लुंबिनी कुंज बुध्द विहारच्या बाजूला रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास प्रितेश गणेश कांबळे हा क्रिकेट खेळत होता.

पुण्यातील खडकी परिसरात रात्री पावणे दहाच्या सुमारास मित्रांसमवेत क्रिकेट खेळत असताना. घरावर गेलेला चेंडू काढताना ११ वर्षीय मुलाचा लोखंडी खांबाला हात लागून शॉक बसल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेची माहिती खडकी पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खड़कीतील मरिआई माता परिसरात असणाऱ्या लुंबिनी कुंज बुध्द विहारच्या बाजूला रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास प्रितेश गणेश कांबळे हा क्रिकेट खेळत होता. त्याच दरम्यान त्या परिसरात राहणारे चंद्रकांत कांबळे यांच्या घरावर चेंडू गेला. त्या घराचे छप्पर हे पत्र्याचे होते आणि बाजूला एक लोखंडी खांब आहे. प्रितेश घरावर जाताना बाजूला असणाऱ्या खांबाला दोन्ही हाताने पकडले. तेवढ्यात त्याला शॉक बसल्याचे त्याच्या भावाच्या लक्षात येताच. त्याने झाडू मारून बाजूला काढले आणि त्वरीत जवळील खडकी कंटोन्मेंट रूग्णालयात नेले. डॉक्टरानी त्याला मृत घोषित केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. परिस्थिती लक्षात घेऊन रूग्णालय परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# योजना प्रभावीपणे राबवा : रावसाहेब दानवे

**पिंपरी** : अतिशय खडतर परिस्थितीतून प्रवास करीत भारतीय जनता पक्षाने देशातील ७० टक्के भूभागावर सत्ता मिळवली आहे. आता ज्या ठिकाणी आपले अस्तित्व कमी आहे, त्याठिकाणी पक्षाचा विस्तार करायचा आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने योजनांचा कार्यक्रम ठरवून दिला आहे. तो कार्यक्रम समाजातील तळागाळात राबवायचा आहे, असे मार्गदर्शन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना केले. राज्यातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित भाजपच्या कार्यकारिणी परिषदेचे उद्‌घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.

# आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा लावणारे ८ अटकेत



**पुणे** : आयपीएल सामन्यांवर सट्टा लावणाऱ्या आठजणांना पिंपरी पोलिसांनी छापा टाकून आज (रविवारी) रात्री अटक केली. चिंचवडच्या काळभोरनगर येथील हायवे टॉवर्स इमारतीच्या टेरेसवर ही कारवाई करण्यात आली.

पंजाब विरूद्ध दिल्ली आणि हैदराबाद विरूद्ध कलकत्ता मॅचवर सट्टा लावणाऱ्या ८ जणांना पिंपरी पोलिसांनी छापा टाकून अटक केली. त्यांच्याकडून १० मोबाईल, टीव्ही, रोकड जप्त करण्यात आली.

काळभोरनगर चिंचवड येथील हायवे टॉवर बिल्डींगच्या टेरेसवर वरिष्ठ निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर, फौजदार विठ्ठल बढे व पथकाने रात्री साडेदहा वाजता ही कारवाई केली.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.